गट 'क' व 'ड' (वर्ग - ३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठितता घालविण्या-संबंधी योजना.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन निर्णय, क्रमांक - वेतन ११०६/प्र.क्र.३०/सेवा-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १ नोव्हेंबर, २००८.

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.- एसआरव्ही १०९५/प्र.क्र१/ ९५/बारा, दि. ८ जून, १९९५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.-वेतन ११९९/ प्र.क्र.२/९९/ सेवा -३, दि. २० जूलै, २००१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.-वेतन ११०६/ प्र.क्र.३०/ सेवा -३, दि.१० सप्टेंबर, २००७.

**प्रस्तावना -**

स्वविनंतीनुसार अथवा अन्य कारणास्तव बदली झाल्यामुळे ज्येष्ठता गमावलेल्या कर्मचा-यांची बदलीपूर्वीची नियमित व सलग सेवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी विचारात घेण्याचे आदेश वरील अ.क्र.३ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेश त्यावेळी मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या अधीन राहून देण्यात येत असल्याचे त्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एसएलपी) क्र. १८०९३/२००१ अन्वये दाखल करण्यात आलेल्या सिव्हिल अपील क्र. १०२१/२००२ संदर्भात दिनांक १७ जानेवारी, २००८ रोजी अंतिम निर्णय झाला आहे. सदर निर्णयान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने मूळ अर्ज क्र. ९३०/१९९९ संदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई आणि रीट याचिका क्र. ५४९४/२००० संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेला बदलीपूर्वीची सेवा कालबध्द पदोन्नती योजनेसाठी विचारात घेण्याचा निर्णय कायम ठेवलेला आहे.

३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर बदली पूर्वीची नियमित सेवा कालबद्ध पदोन्नती योजनेसाठीही ग्राह्य धरण्याचे आणि वरील अ.क्र.३ येथील शासन निर्णयात सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय**

शासन आता असे आदेश देते की, स्वविनंतीनुसार अथवा अन्य कारणास्तव बदली झाल्यामुळे ज्येष्ठता गमावलेल्या कर्मचा-यांची बदलीपूर्वीची नियमित सेवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसाठी ग्राह्य धरण्याचा वरील अनुक्रमांक ३ मधील परिच्छेद - २ अन्वये देण्यात आलेला लाभ दि. ०१ ऑक्टोबर, १९९४ पासून अंमलात आलेल्या कालबद्ध पदोन्नती योजनेसाठी देखील देण्यात यावा.

२. प्रस्तावनेतील परिच्छेद २ मधील पार्श्वभूमी विचारात घेवून वरील अ.क्र. ३ येथील दिनांक १० सप्टेंबर,२००७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ आणि ८ या आदेशात्मये आता निरसित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या "www.maharashtra.gov.in" या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००८११०५११३६५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अरविंद पाटील
**शासनाचे उप सचिव**

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
* आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/ नागपूर/ औरंगाबाद,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
महालेखापाल -१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल -२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/ नागपूर/ पुणे/ औरंगाबाद,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३).

--------------

* पत्राद्वारे